<u>नि.क.१४</u>

<u>नि.फौ.ख.कं.१२४/२०२१</u> सरकार -वि-राहुल

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क. ०४ ची जबानी**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**
माझे नाव : विकास रावसाहेब जाधव
वय :- ३४ वर्षे, पद :-पोउपनि
नेमणुक :- पो.स्टे एमआयडीसी.

**<u>साक्षदाराची सरतपासणी सरकारतर्फे व्ही.एस.जगताप सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. सन २०२१ मध्ये मी पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे पोलीस उपनिरिक्षक म्हणून कार्यरत होतो. दि.२७.०२.२०२१ रोजी मी दिवसपाळी अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना नियंत्रण कक्ष नागपुर येथुन मला अरूण सिंग यांचा फोन आला व त्यांच्या घरी चोरी झाल्याबाबत त्यांनी मला माहिती दिली. त्यानंतर मी शासकीय वाहनाने घटनास्थळावर गेलो. फिर्यादीने मला घटनास्थळ दाखविली. घराचे कुलुप व लाकडी दांडा तुटलेला होता. घरातील सामान अस्ताव्यस्त झालेले होते. दिसत्या परिस्थीतीचे पाहणी करून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला नि.११ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नि.०५ वर फिर्यादीचा रिपोर्ट नोंदविला. आता मला रिपोर्ट व एफआयआर दाखविला. त्यावर त्यावर माझी व फिर्यादी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पुढील तपास पीएसआय राजाराम ढोरे यांनी केला आहे.

**<u>साक्षदाराचा उलटतपास आरोपीतर्फे रंगारी वकील मॅडम:</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही घटनास्थळावर गेलो नाही व पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे रिपोर्ट नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, एफआयआरमधील मजकुर खोटा व चुकीचा आहे.

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत, | माझे समक्ष, |
| (एस.एस.ओसवाल)<br>न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,<br>हिंगणा<br>दि.१४.१२.२०२२ | (एस.एस.ओसवाल)<br>न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,<br>हिंगणा<br>दि.१४.१२.२०२२ |